## महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ डिसेंबर २००३

## आदेश

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक. २००३/२०९३/प्र.क्र. ४६२/म-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ९, खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महसूल व वन विभाग, क्रमांक मुद्रांक २०००/४२२९/सी.आर.१०६४/म-१, दि. ५ मे २००१ अन्वये एक आदेश काढला होता आणि त्याद्वारे, १ एप्रिल २००१ पासून सुरू होणाऱ्या व ३१ मार्च २००६ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी गट अ व गट ब या क्षेत्रातील बिगर सरकारी क्षेत्रात, आय.टी.पार्क व बायो-टेक पार्कचे "एक नवीन युनिट" सुरू करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान युनिटे व बायो-टेक युनिटे यांनी निष्पादित केलेल्या संलेखांवर, उक्त अधिनियमाच्या अनुसूची एक मध्ये तारणगहाण, हडप, तारण, विलेख [अनुच्छेद ६(२)], अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद २५) आणि भाडेपट्टा (अनुच्छेद ३६) यांच्याशी संबंधित संलेखांवर, उक्त अधिनियमान्वये आकारणीयोग्य असलेल्या मुद्रांक शुल्कामध्ये पन्नास टक्के सूट दिली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास, विवक्षित फेरबदलांसह अशी सूट देणे इष्ट वाटते;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, लोकहितास्तव तसे करणे आवश्यक आहे अशी खात्री पटली असल्याने, महाराष्ट्र शासन, याद्वारे, माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) युनिटे व माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) सहाय्यभूत सेवा युनिटे, यांनी इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी पार्कमध्ये नवीन माहिती तंत्रज्ञान युनिट सुरू करण्यासाठी निष्पादित केलेल्या,उक्त अधिनियमाच्या अनुसूची एक मध्ये तारणगहाण, हडप, तारण, विलेख [अनुच्छेद ६(२)], अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद २५) आणि भाडेपट्टा (अनुच्छेद ३६) यांच्याशी संबंधित संलेखांवर, उक्त अधिनियमान्वये आकारणीयोग्य असलेल्या मुद्रांक शुल्कामध्ये ७५ टक्के सूट मिळू शकेल. तसेच संमती व परवानगी (अनुज्ञा), करारनामा [अनुच्छेद ३६(अ)] आणि भाडेपट्ट्याचे हस्तांतरण (अनुच्छेद ६०) याबाबतच्या अतिरिक्त संलेखांवर आकारणीयोग्य असलेल्या मुद्रांक शुल्काच्या ९० टक्के एवढी सूट ४ जून २००३पासून सुरू होणाऱ्या व ३१ मे, २००८ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी मिळू शकेल, असे जाहीर करीत आहे.

**स्पष्टीकरण.**—या आदेशाच्या प्रयोजनार्थ, ''माहिती तंत्रज्ञान युनिट'' आणि ''माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा युनिट'' याचा अर्थ, सामूहिक प्रोत्साहन योजना, २००१ अंतर्गत व्याप्तीक्षेत्रे म्हणून वर्गीकरण करण्यात आलेल्या गट ''अ'' व गट ''ब'' या व्याप्तीक्षेत्रामधील बिगरसरकारी क्षेत्रात विकास आयुक्त (उद्योग) यांने किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिका-याने असे युनिट म्हणून प्रमाणित केलेली युनिटे, असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**भा. सु. तायडे,**
शासनाचे अवर सचिव.